नाशिक जिल्हा परिषद नाशिक (सामान्य प्रशासन विभाग)दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५९१०१०

जाक्र/साप्रवि/आस्था-६ / ३८८ /२०१७
नाशिक दिनांक:- ०७ / ०८/२०१७

प्रति,

१. खाते प्रमुख -----------(सर्व),जिल्हा परिषद नाशिक
२.गट विकास अधिकारी,पंचायत समिती, ----------(सर्व)

**विषय :- अनाधिकृत गैरहजेरी कर्मचाऱ्यांचे (गट-क व गट-ड ) प्रकरणी बडतर्फीची कारवाई बाबत.**

उपरोक्त विषयाकडे आपले विशेष लक्ष वेधण्यात येत आहे की, नाशिक जिल्हा परिषद अधिनस्त विविध आस्थापना विभागामध्ये अनेक कर्मचारी (गट-क व गट-ड) अनाधिकृत गैरहजर असल्याचे कारणास्तव खाते चौकशी केली जाते खाते चौकशी अहवालाच्या आधारे संबंधीत अनाधिकृत गैरहजर कर्मचाऱ्याच्या विरूध्द काही प्रकरणामध्ये जिल्हा परिषद सेवेतुन बडतर्फ करणे, सक्तीने सेवानिवृत्त करणे, मुळ वेतनावर आणणे अशा प्रकारे शिक्षेची कार्यवाही केली जाते.

तथापी अशा प्रकरणामध्ये माझे असे निदर्शनास आले आहे. काही कर्मचारी अनाधिकृत गैरहजेरी कालावधी हा दोन वर्ष ते दहा वर्षा पर्यंतचा कालावधी आहे. हया गैरहजर कालावधीमध्ये संबंधीत अनाधिकृत कर्मचाऱ्याविरूध्द दोषारोप दाखल करून खाते चौकशी प्रस्तावित करणे आवश्यक होते. परंतु केवळ हलगर्जीपणामुळे खाते चौकशी प्रस्तावित करण्याची कार्यवाही विलंबाने सुरू केल्याने अशा कर्मचाऱ्याविरूध्द शिक्षेची कार्यवाही प्रस्तावित करणेस विलंब झालेला आहे.

जुन २०१७ पासून अनाधिकृत गैरहजेरी प्रकरणी जि.प.सेवेतुन बडतर्फ करणे, सक्तीने सेवानिवृत्त करणे, अशा प्रकारची शिक्षा केलेल्या प्रकरणामध्ये संबंधीत कर्मचाऱ्याच्या गैरहजर कालावधीमध्ये विलंबाने शिक्षेची कार्यवाही झालेली आहे. (उदा.अनाधिकृत गैरहजर कालावधी सन २००१ ते सन २०१० पर्यंतचा असतांना शिक्षेची कार्यवाही सन २०१७ मध्ये होत आहे.) अशा विलंब प्रकरणी संबंधीत कार्यालयाचे संकलन कर्मचारी, पर्यवेक्षिय अधिकारी व कार्यालय प्रमुख हे जबाबदार असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे.

शिक्षेची कार्यवाही झालेल्या प्रकरणामध्ये विलंब हा कोणत्यास्तरावर झालेला आहे. तसेच विलंबास कोण संबंधीत संकलन कर्मचारी, पर्यवेक्षिय अधिकारी तसेच कार्यालय प्रमुख जबाबद्वार आहेत. या संबंधीचा सविस्तर तपशील प्रकरण निहाय हे पत्र प्राप्त झालेपासुन सात दिवसाच्या आत सादर करावा.

Deepak
2/09/18

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नाशिक

**प्रत :- मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.**